# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

## Maharashtra Water Resources Regulatory Authority (MWRRA)

9th Floor, Centre-1, World Trade Centre, Cufffe Parade, Mumbai - 400005. Tel.: 2215 2019 Fax.: 2215 3765 E-mail: mwrra@mwrra.org


क्र. मजनिप्रा/२०१७/प्र.मा./तापाविम/९५/२९० दिनांक : १६/०६/२०१७

प्रति,
कार्यकारी संचालक
तापी पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन भवन, आकाशवाणी चौक,
जळगांव -४२५००१

विषय : गिरणा नदीवरील प्रस्तावित ७ - Pneumatically Operated Gated Weir, मध्यम प्रकल्प जि. जळगाव, या प्रकल्पास मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : का. अ. तापाविम, जळगाव यांचे पत्र क्र. तापाविम/प्रशा-५/ २३४२/सन २०१७ दि. २५/०५/२०१७

१. संदर्भीय पत्रान्वये गिरणा नदीवरील प्रस्तावित ७ - Pneumatically Operated Gated Weir, मध्यम प्रकल्प जि. जळगाव, या प्रकल्पाच्या प्रस्तावास मजनिप्रा अधिनियम २००५ च्या कलम ११(च) अन्वये मान्यता मिळणेबाबत चा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रकल्पामध्ये तापी खोऱ्यातील गिरणा नदीवर गिरणा धरणाच्या खालील बाजूस ७ बंधारे - मेहूणबारे (७१५ हे), बहाळ (६०३ हे), पांढरद (६०३ हे), भडगाव (४६४ हे), परधाडे (७६७ हे), कुरंगी (७७० हे) व कानळदा (५१० हे) असे एकूण ४४३२ हेक्टर सिंचन क्षेत्र असलेले बंधारे प्रस्तावित केलेले आहेत. सर्व बंधाऱ्यांसाठी जलसंपदा विभागातर्फे प्रथमच Pneumatically Operated Gates प्रस्तावित केलेले आहेत. सर्व बंधाऱ्यांसाठी मु. अ. जलविज्ञान, नाशिक यांनी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिलेले आहे. सदर प्रकल्पाची एकूण किंमत ७११.८३ कोटी असून प्रकल्पाचा लाभ-व्यय गुणोत्तर १.५५ येत आहे.

३. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या कलम ११(च) नुसार नवीन प्रकल्पांना मान्यता देणेपूर्वी खालील निकषांच्या अनुषंगाने प्राधिकरणाने तपासणी करणे गरजेचे आहे;

३.१ **प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य असणे** - प्रस्तावित प्रकल्पाची एकूण किंमत ७११.८३ कोटी असून प्रकल्पाचा लाभ-व्यय गुणोत्तर १.५५ येत आहे. मोठे व मध्यम प्रकल्पासाठी लाभ-व्यय गुणोत्तर मापदंड १.५० असून प्रस्तावित मध्यम प्रकल्प आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य आहे.

३.२ **प्रकल्प जलवैज्ञानिक दृष्ट्या viable असणे** - प्रस्तावित प्रकल्पास मुख्य अभियंता (नियोजन व जलविज्ञान) नाशिक यांनी दि. २२/१०/२०१३ रोजी पाणी उपलब्धता प्रमाणपत्र दिलेले आहे. सबब प्रकल्प जलवैज्ञानिक दृष्ट्या viable आहे.

३.३ **प्रकल्प पर्यावरणीय दृष्ट्या viable असणे** - प्रस्तावित प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र २००० हे. पेक्षा जास्त असल्याने प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण मान्यतेची गरज आहे.

३.४ **प्रकल्प एकात्मिक राज्य जल आराखड्याचा भाग असणे** - राज्य जल आराखडा अद्याप मंजूर झालेला नाही म्हणजेच प्रस्तावित प्रकल्प सध्या मंजूर एकात्मिक राज्य जल आराखड्याचा भाग नाही.

यापैकी, परि. ३.१ व ३.२ मधील निकषाची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे. परि. ३.३ ची पूर्तता प्रकल्पास प्र.मा. नंतरही करणे शक्य आहे. परि. ३.४ ची पूर्तता झाले खेरीज उक्त कायद्यातील तरतुदीनुसार प्राधिकरणास नवीन प्रकल्पाला मान्यता देता येत नाही.

४. या अनुषंगाने आपले निदर्शनास आणण्यात येते कि, मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात चालु असलेल्या जनहित याचिका क्र. १२४ वर्ष २०१४ संदर्भात राज्य शासनाने दि. ४ जून २०१५ रोजी शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये राज्य शासनाने स्वयंघोषित असे निर्बंध घातले आहेत की यापुढे जोपर्यंत राज्याच्या मंजूर झालेल्या एकात्मिक जल आराखड्याच्या कक्षेबाहेर असलेल्या किंवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये मा. राज्यपालांच्या पूर्व मंजूरी शिवाय कोणत्याही नविन जलसंपदा प्रकल्पाला प्रशासकिय मान्यता दिली जाणार नाही.

५.  या निर्बंधाला अनुलक्षून मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. १३ जुलै २०१५ रोजीच्या आदेशामध्ये परि. ५ नुसार "प्रतिवादी - राज्य शासनाला असे निर्देश दिले आहेत की जोपर्यंत एकात्मिक राज्य जल आराखडा अंतिम होत नाही आणि अधिनियमात विहित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन होत नसेल तर नविन जलसंपदा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देऊ नयेत" असे आदेश दिलेले आहेत.

६.  उपरोक्त परि. ३, ४ व ५ मधील वस्तुस्थिती विचारात घेता संदर्भिय प्रस्तावास सद्यस्थितीत मान्यता देता येत नाही.

(डॉ. सुरेश कुलकर्णी)
सचिव

प्रत

१) प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड मुंबई - ४०००३२.

२) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, सिंचन भवन, आकाशवाणी चौक, जळगांव - ४२५ ००१.

३) अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, गिरणा भवन, जळगाव - ४२५ ००१.